**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**माहिती व जनसंपर्क विभाग**

**प्रसिद्धीपत्रक**

## ➢ CSR निधीच्या माध्यमातून मिळालेल्या विविध शालेय साहित्यांचा व वैद्यकीय उपकरणांचा ई-अनावरण लोकार्पण सोहळा पार पडला

मिरा-भाईंदर महानगरपालिका शिक्षण व आरोग्य क्षेत्रात आधुनिक सुविधांसह भरीव कामगिरी करत आहे. दि. २५ सप्टेंबर २०२५ रोजी मा. आयुक्त तथा प्रशासक राधाबिनोद अ. शर्मा (भा.प्र.से.) यांच्या हस्ते CSR निधीच्या माध्यमातून मिळालेल्या विविध शालेय व वैद्यकीय साहित्यांचे ई-अनावरण करण्यात आले.

मा. आयुक्त यांच्या नेतृत्वाखाली, महानगरपालिकेच्या नाविन्यता कक्षाच्या समन्वयाने IDBI बँकेच्या SEED (Supporting Education for Empowerment and Development) उपक्रमांतर्गत CSR निधीद्वारे; प्रथम टप्प्यात एकूण ३८ लाख २५ हजार रुपये किंमतींच्या सुविधा पुरविण्यात आल्या आहेत. यामध्ये शिक्षण क्षेत्रात मनपाच्या १२ शाळांमध्ये स्मार्ट डिजिटल पॅनल्स, ४ शाळांमध्ये वॉटर प्युरिफायर, २ शाळांमध्ये डिजिटल लायब्ररी व एका शाळेत आधुनिक संगणक संच इ. सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत.

दुसऱ्या टप्प्यात IDBI बँकेच्या SEED (Supporting Education for Empowerment and Development) व HOPE (Health Care Outreach Program for Everyone) उपक्रमांतर्गत २२ लाख ५० हजार किंमतीचे CSR निधीद्वारे शिक्षण क्षेत्रात मनपाच्या १२ शाळांमध्ये स्मार्ट डिजिटल पॅनल्स दिले आहेत व आरोग्य क्षेत्रात महानगरपालिकेच्या स्व. इंदिरा गांधी सामान्य रुग्णालय व ३ नागरी आरोग्य केंद्रांना ECG मशीन, Biomedical Waste Incinerator, Neonatal Pulse Oximeter इ. उपकरणे उपलब्ध करून दिलेली आहेत.

या दोन्ही टप्प्यात एकूण ६० लाख ७५ हजार किंमतीचे साहित्य व उपकरणे CSR निधीच्या माध्यमातून उपलब्ध करून देण्यात आले आहे. या सुविधांमुळे मनपाच्या शाळा या आधुनिक व स्मार्ट होण्यास मदत होईल. तसेच महानगरपालिका रुग्णालयाची व नागरी आरोग्य केंद्राची रुग्णसेवा अधिक जलद, अचूक आणि सुरक्षित होऊन त्यांचा दर्जा उंचावेल असे मा. आयुक्त यांनी सांगितले मिरा भाईंदर महानगरपालिका विकसित शहराकडे वाटचाल करत असून शिक्षण व वैद्यकीय क्षेत्रात भरीव कामगिरी करण्याच्या दृष्टीने हे पाऊल लक्षणीय आहे.